भारत सरकार

विधि व न्याय मंत्रालय

सत्यमेव जयते

# आर्थिक अपराध (मुदतमर्यादा लागू नसणे) अधिनियम, १९७४

(सन १९७४ चा अधिनियम क्रमांक १२)

[१ मार्च १९८९ रोजी यथाविद्यमान]

# The Economic Offences (Inapplicability of Limitation) Act, 1974

## (Act No. 12 of 1974)

[*As in force on the 1st March 1989*]

संचालक, मुद्रण व लेखनसामग्री, महाराष्ट्र शासन यांनी

भारत सरकारच्या वतीने मुद्रित व प्रकाशित केले.

१९९१

[ किंमत : रु. १.२० ]

# प्राक्कथन

या आवृत्तीत, दिनांक १ मार्च १९८९ रोजी यथा विद्यमान असलेला दि इकॉनॉमिक ऑफन्सेस (इनॲप्लीकॅबिलिटी ऑफ लिमिटेशन) ॲक्ट, १९७४ याचा मराठीतील प्राधिकृत पाठ दिलेला आहे. हा पाठ भारताचे राजपत्र, असाधारण, भाग बारा, अनुभाग १, खंड १, अंक १, दिनांक ९ जुलै १९९० यात पृष्ठे ३ ते ४ मध्ये प्रकाशित करण्यात आला होता. हा प्राधिकृत मराठी पाठ, प्राधिकृत पाठ (केंद्रीय विधि) अधिनियम, १९७३ याच्या कलम २, खंड (क्) अन्वये राष्ट्रपतींच्या प्राधिकाराने प्रकाशित करण्यात आला होता आणि अशा रीतीने प्रकाशित करण्यात आल्यानंतर हा पाठ, उक्त अधिनियमाचा प्राधिकृत मराठी पाठ म्हणून समजण्यात आला आहे.

नवी दिल्ली :<br>
दिनांक ९ जुलै १९९०.

व्ही. एस. रमादेवी,<br>
सचिव, भारत सरकार.

# PREFACE

This edition of the Economic Offences (Inapplicability of Limitation) Act, 1974 as on the 1st March 1989 contains the authoritative text of that Act in Marathi which was published in the *Gazette of India,* Extraordinary Part XII, Section 1, No. 1., Vol. 1, dated 9th July 1990 on pages 3 to 4.

This authoritative text was published under the authority of the President under section 2, clause (*a*) of the Authoritative Texts (Central Laws) Act, 1973 and on such publication it became the authoritative text of that Act in Marathi.

V. S. RAMADEVI,<br>
Secretary to the Government of India.

New Delhi, 9th July 1990.

# आर्थिक अपराध (मुदतमर्यादा लागू नसणे) अधिनियम, १९७४

कलमांचा क्रम

कलमे

१. संक्षिप्त नाव, विस्तार व प्रारंभ.

२. विवक्षित आर्थिक अपराधांना 'फौजदारी प्रक्रिया संहिता, १९७३'—प्रकरण ३६ लागू नसणे.

अनुसूची

एच ४७९२—२ (८३४—६-९१)

# आर्थिक अपराध (मुदतमर्यादा लागू नसणे) अधिनियम, १९७४

(सन १९७४ चा अधिनियम क्रमांक १२)

(दिनांक १ मार्च १९८९ रोजी यथाविद्यमान)

[२७ मार्च, १९७४]

**'फौजदारी प्रक्रिया संहिता, १९७३'—प्रकरण ३६ याचे उपबंध विवक्षित आर्थिक अपराधांना लागू न करण्याबाबत उपबंध करण्यासाठी अधिनियम.**

भारतीय गणराज्याच्या पंचविसाव्या वर्षी संसदेकडून पुढीलप्रमाणे अधिनियमित होवो :—

**संक्षिप्त नाव, विस्तार व प्रारंभ.**[1]

१. (१) या अधिनियमास 'आर्थिक अपराध (मुदतमर्यादा लागू नसणे) अधिनियम, १९७४' असे म्हणता येईल.

(२) ज्या राज्यक्षेत्रांना 'फौजदारी प्रक्रिया संहिता, १९७३' (१९७४ चा २) ही लागू होते त्या राज्यक्षेत्रांमध्ये या अधिनियमाचा विस्तार आहे.

(३) तो १ एप्रिल, १९७४ रोजी अंमलात येईल.

**विवक्षित आर्थिक अपराधांना 'फौजदारी प्रक्रिया संहिता, १९७३'—प्रकरण ३६ लागू नसणे.**

२. 'फौजदारी प्रक्रिया संहिता, १९७३'—प्रकरण ३६ यामधील कोणतीही गोष्ट,—

(एक) अनुसूचीमध्ये विनिर्दिष्ट केलेल्यांपैकी कोणत्याही अधिनियमितीखाली [1][किंवा तिचे उपबंध, कोणतेही असल्यास, त्याखाली] शिक्षापात्र असणाऱ्या कोणत्याही अपराधास; किंवा

(दोन) अशा अपराधाबरोबर त्याच संहितेच्या उपबंधाखाली ज्याची संपरीक्षा करता येईल अशा अन्य कोणत्याही अपराधास,

लागू होणार नाही आणि खंड (एक) व खंड (दोन) मध्ये निर्देशित केलेल्या प्रत्येक अपराधाबाबत अधिकारिता असलेल्या न्यायालयाला जणू काही या प्रकरणाचे उपबंध अधिनियमित झालेले नसावेत अशा प्रकारे दखल घेता येईल.

---

१. सन १९८४ चा अधिनियम क्रमांक ६५, कलम १० अन्वये घालण्यात आला.

अनुसूची

(कलम २ पहा)

१. भारतीय प्राप्तिकर अधिनियम, १९२२ (१९२२ चा ११).

[1][१क. कॉपिराईट अधिनियम, १९५७ (१९५७ चा १४) कलम ६३ चा खंड (क्).]

२. प्राप्तिकर अधिनियम, १९६१ (१९६१ चा ४३).

[2][२क. व्याज कर अधिनियम, १९७४ (१९७४ चा ४५).]

[3][२ख. हॉटेल मिळकत कर अधिनियम, १९८०.]

[4][२ग. व्यय कर अधिनियम, १९८७.]

३. कंपनी (नफा) उपरिकर अधिनियम, १९६४ (१९६४ चा ७).

४. धनदौलत कर अधिनियम, १९५७ (१९५७ चा २७).

५. दान कर अधिनियम, १९५८ (१९५८ चा १८).

६. केंद्रीय विक्रीकर अधिनियम, १९५६ (१९५६ चा ७४).

७. केंद्रीय उत्पादन शुल्क व मीठ अधिनियम, १९४४ (१९४४ चा १).

८. औषधी व प्रसाधन सिद्धपदार्थ (उत्पादन शुल्क) अधिनियम, १९५५ (१९५५ चा १६).

९. सीमाशुल्क अधिनियम, १९६२ (१९६२ चा ५२).

१०. सुवर्ण (नियंत्रण) अधिनियम, १९६८ (१९६८ चा ४५).

११. आयात व निर्यात (नियंत्रण) अधिनियम, १९४७ (१९४७ चा १८).

१२. परकीय विनिमय चलन विनियमन अधिनियम, १९४७ (१९४७ चा ७).

१३. परकीय विनिमय चलन विनियमन अधिनियम, १९७३ (१९७३ चा ४६).

१४. भांडवल निर्गम (नियंत्रण) अधिनियम, १९४७ (१९४७ चा २९).

१५. भारतीय मुद्रांक अधिनियम, १८९९ (१८९९ चा २).

१६. आकस्मिक धोका (माल) विमा अधिनियम, १९६२ (१९६२ चा ६२).

१७. आकस्मिक धोका (कारखाने) विमा अधिनियम, १९६२ (१९६२ चा ६३).

१८. आकस्मिक धोका (माल) विमा अधिनियम, १९७१ (१९७१ चा ५०).

१९. आकस्मिक धोका (उपक्रम) विमा अधिनियम, १९७१ (१९७१ चा ५१).

२०. सर्वसाधारण विमा व्यवसाय (राष्ट्रीयीकरण) अधिनियम, १९७२ (१९७२ चा ५७).

[5][२१. उद्योग (विकास व विनियमन) अधिनियम, १९५१ (१९५१ चा ६५).]

---

१. सन १९८४ चा अधिनियम क्रमांक ६५, कलम १० द्वारे समाविष्ट केला. (१४ सप्टेंबर १९८४ रोजी व तेव्हांपासून.)

२. सन १९७४ चा अधिनियम क्रमांक ४५, कलम ३०(२) द्वारे समाविष्ट केला.

३. सन १९८० चा अधिनियम क्रमांक ५४, कलम ३७ (२) द्वारे समाविष्ट केला.

४. सन १९८७ चा अधिनियम क्रमांक ३५, कलम ३३ द्वारे समाविष्ट केले (१ नोव्हेंबर १९८७ रोजी व तेव्हांपासून).

५. सन १९८१ चा अधिनियम क्रमांक ४६, कलम २ द्वारे समाविष्ट केला. (१५ डिसेंबर १९८१ रोजी व तेव्हांपासून.

---

शासकीय मध्यवर्ती मुद्रणालय, मुंबई